नवप्रभा

सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०१५

# हळबे महाविद्यालयात श्रावण बरसला

**दोडामार्ग**

श्रावण महिन्यातील सारी धरणी हिरवागार शालू पांघरून नवं रुप धारण करते. निसर्गात अनेक बदल होत असतात. या प्रसन्न व मांगल्यपूर्ण चैतन्यमय वातावरणाच्या पार्श्वभूमीवर येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात मराठी भाषा व वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनाचे निमित्त साधून 'श्रावणोत्सव' हा पावसाळी कवितांवर आधारित कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास गोव्यातील सुप्रसिद्ध कवयित्री व लोक साहित्याच्या अभ्यासक प्रा. पौर्णिमा केरकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी श्रावण महिन्यातील बदलांचे चित्रण करणाऱ्या कविता सादर केल्या. नभ मेघांनी भरले, झाड न झाड ओथंबूनी गेले, श्रावणरंगी धून बरसली, दव बिंदुतूनी इंद्रधनुचे रंग खुलले, फुलाफुलांमधूनी गीत उमलले, श्रावणातला पाऊस हा असा पाठशिवणीचा खेळ खेळणारा, आपल्यालाही एखादी सर अंगावर घ्यावीशी वाटणारा डोंगरावरचा पाऊस, माळावरची वाऱ्यावर डोलणारी रंगीबेरंगी फुले, त्यावर फुला पाखराची स्वच्छंदी बागडणे, चिंब भिजणारी झाडे, उडणारे पक्षी हाच पाऊस आपल्याला जगायला प्रेरणा देतो.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून श्रावण महिन्यातील पावसाची विविध रुपे अभिव्यक्त करणारे सृजन भित्तीपत्रक व पोस्टर मेकिंग स्पर्धेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या काव्य वाचन व काव्य गायनाचा कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरा झाला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पावसावरच्या विविध कविता सादर केल्या. प्रणाली शेटकर हिने सासोलीचो पावस तिरपो तिरपो पडता ही कविता सादर करून वाहवा मिळवली. उपस्थितांनी विविध गीतांचाही आस्वाद घेतला. कार्यक्रमाच्या प्रास्तविकात मराठी भाषा वाङ्मय मंडळाचे प्रमुख प्रा. दिलीप बर्वे यानी कार्यक्रमाची भूमिका व महत्त्व विशद केले. त्यानी स्वागत केले. यावेळी व्यासपीठावर प्रा. प्रशांत हेपे, प्रा. एम. टी. बेग, प्रा. सोनम देसाई उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वाती फाटक हिने तर आभार एस.एस. पाडगावकर यानी मानले.